
# घागर..



आले अवेळी भरून
निळ्या आभाळाचे डोळे
घट्ट पकडते माती
लेकरांची पाळेमुळे

काळजाच्या कपारीत
पाणी मायेचे वाहते
ऋतू येतात जातात
ओल उरात राहते

काळ आला मोठा बाका
रस्ता क्षणात वळतो
आला पोटामही गोळा
तो का कुणाला कळतो ?

कुणी असती कनवाळू
कुणी स्वत:मध्ये दंग
सरडा लाजून मरेल
असा बदलू नये रंग

स्वार्थाच्या आड खोल
परि सदा तो कोरडा
कसा भरेल त्याच्या काठी
तुझा न माझा घडा

चोरपावलांनी जातो कुठं
उठून पाहे माय रखमा
बाप जगाचा विठूराया,
पुसे लेकरांच्या जखमा...

प्रेम घागर डवलीबी
लई मोठी तिची ख्याती
काठोकाठ भरेल पुन्हा
जशी करावी ती रिती

[टीप-
कपार - खडकांची रचना/गुहा
बाका - अवघड
कनवाळू - मायाळू
आड - खोल विहीर]

- कु. अमिता अशोक पाटील,
पुणे.